| | | |
|---|---|---|
| सत्यमेव जयते | **राज्य आरोग्य माहिती व जीवनाविषयक आकडेवारी कार्यालय**<br>**महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग**<br>ऊरो रुग्णालय, तिसरा मजला, औंध, पुणे – ४११०२७ | |
| **उपसंचालक आरोग्य सेवा (आ मा जी आ)**<br>**तथा उपमुख्य निबंधक जन्म मृत्यू**<br>**महाराष्ट्र राज्य, पुणे** | | संकेतस्थळ : arogya.maharashtra.gov.in<br>कार्यालय : ०२० – २६०५८७४७<br>नानोप विभाग : ०२० – २६०५८२९२<br>ई -मेल: crs_d81@yahoo.com |
| **आरोग्य सेवा**<br>**ना.नों.प.** | जा. क्र. आमजीआ/ कक्ष-८१/ ना.नो.प./ CRS Portal/Multiple Login/ 7349-96 /२६<br>दिनांक ०३/०७/२०२६ | |


प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी
 तथा जिल्हा निबंधक, जन्म मृत्यू
 जिल्हा परिषद...सर्व

२) कार्यकारी आरोग्य अधिकारी
 मुंबई महानगरपालिका

विषय: केंद्र शासनाच्या CRS Portal मध्ये एकाच User ID चा वापर करून एकाच वेळी अनेक ठिकाणांहून लॉगिन करता येत नसल्याबाबत.

संदर्भ: मा. उपमहानिबंधक भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. 11/12/2021-VS(CRS)-Part (1)/2706 दिनक 25-06-2026

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, राज्यातील बऱ्याच जिल्ह्यांमार्फत तसेच निबंधकांमार्फत केंद्रशासनाच्या नागरी नोंदणी प्रणाली CRS Portal वर एकाच User ID व Password चा वापर करून निबंधक यांना एकाच वेळी अनेक संगणकावर लॉगिन करता येत नसल्यामुळे कामकाजात अडचणी येत आहेत अशा तक्रारी या कार्यालयास प्राप्त झाल्या होत्या.

याबाबत सूचित करण्यात येते की, केंद्रशासनाच्या उपरोक्त संदर्भिय पत्रानुसार निबंधक उपनिबंधक तसेच त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत/सर्व वापरकर्त्यांच्या User Details ची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी, सायबर सुरक्षेच्या धोक्यांपासून संरक्षण करण्यासाठी आणि माहिती तंत्रज्ञान (IT) सुरक्षा मानकांचे पालन करण्यासाठी केंद्र शासनामार्फत CRS Portal मध्ये ही सुविधा लागू करण्यात आली आहे. त्यामुळे, आता एकाच User ID आणि Password चा वापर करून एकाच वेळी अनेक संगणक किंवा ब्राउझरवर लॉगिन करता येणार नाही. एक User ID एका वेळी केवळ एका वापरकर्त्यालाच लॉगिन करून वापरता येईल.

केंद्र शासनाच्या नागरी नोंदणी प्रणाली) CRS Portal) मध्ये Role-based User Management ही सुविधा उपलब्ध आहे) या सुविधेद्वारे निबंधक .Registrar) आवश्यकतेनुसार अतिरिक्त अधिकृत Data Entry करिता यांचे अतिरिक्त Account व User ID तयार करू शकतात. तयार करण्यात

आलेल्या अतिरिक्त User ID द्वारे Data Entry करणारे कर्मचारी जन्म-मृत्यू नोंदणीची माहिती प्रणालीमध्ये भरून अहवाल सादर करू शकतात. त्यानंतर निबंधक संबंधित नोंदींची पडताळणी करून प्रमाणपत्र जारी करू शकतात. त्यामुळे, एकाच वेळी अनेक व्यक्तींकडून काम करून घेण्यासाठी निबंधक User Management या टॅबचा वापर करून आवश्यकतेनुसार Data Entry करिता अतिरिक्त Account व User ID तयार करू शकतात.

त्याअनुषंगाने, एकाच User ID चा वापर करून एकाच वेळी अनेक ठिकाणांहून लॉगिन करण्यावरील निर्बंध हा CRS Portal च्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा सुरक्षा उपाय आहे. या उपायामुळे अनधिकृत प्रवेश, User ID व Password चा गैरवापर तसेच संभाव्य सायबर सुरक्षा धोके टाळण्यास मदत होते. सदर निर्बंध शिथिल अथवा रद्द केल्यास Portal तसेच निबंधकांच्या लॉगिनची सुरक्षितता धोक्यात येण्याची शक्यता आहे.

वरील बाबींचा विचार करून, मा. महानिबंधक, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी एकाच User ID द्वारे एकाच वेळी अनेक ठिकाणांहून लॉगिन करण्यावरील निर्बंध कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सर्व जिल्हा निबंधक तसेच त्यांच्या कार्यक्षेत्रातील निबंधक/उपनिबंधक यांनी त्यांच्या कार्यालयीन कामकाजाच्या आवश्यकतेनुसार User Management या सुविधेचा वापर करून Data Entry साठी तसेच इतर आवश्यक अधिकृत अतिरिक्त Account व User ID तयार करून उपलब्ध सुविधेचा प्रभावीपणे वापर करावा.

सर्व जिल्हा निबंधकांनी आपल्या कार्यक्षेत्रातील जन्म मृत्यू नोंदणीशी संबंधित सर्व- निबंधक, उपनिबंधक तसेच संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक सूचना निर्गमित कराव्यात.

सर्व जिल्हा निबंधक यांनी खात्री करावी ही माहिती आपल्या कार्यक्षेत्रामधील सर्व निबंधकांना देण्यात यावी. जेणेकरून त्यांना जन्म मृत्यू कायदा अंमलबजावणी प्रभावीपणे करता येईल तसेच ग्रामपंचायत अधिकारी सर्व वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या बैठकीत नियमित RBD ACT अंमलबजावणीबाबत आढवा घेण्यात यावा.

डॉ. बी.एस.कमलापूरकर
उपसंचालक, आरोग्य सेवा आ.मा.जी.आ.)
तथा उपमुख्य निबंधक, जन्म व मृत्यू,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत कार्यवाहीस्तव:- उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)
२/ वरीलप्रमाणे सूचना परिमंडळातील सर्व जिल्हयांना निर्गमित करण्यात याव्यात.

प्रत माहितीस्तव सविनय सादर:-

१. मा. उप महानिबंधक, भारत सरकार, 2A मान सिंग रोड, नवी दिल्ली.
२. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग ,मंत्रालय मुंबई.
३. मा. सहसचिव, भारत सरकार तथा संचालक, जनगणना कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. मा. आयुक्त, आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक रा . आ.अ, मुंबई.
५. मा. संचालक (प्राथमिक) आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म मृत्यू, पुणे.

भारत सरकार/GOVERNMENT OF INDIA
गृह मंत्रालय/MINISTRY OF HOME AFFAIRS
भारत के महारजिस्ट्रार का कार्यालय
**Office of the Registrar General, India**
नागरिक पंजीकरण प्रणाली 2/ए मानसिंह रोड, नई दिल्ली-110011
Civil Registration System, 2/ A Man Singh Road,
New Delhi-110011, Email- drg-crs.rgi@nic.in

F. No. 11/12/2021-VS(CRS)-Part(1)/12706 Dated: 25.06.2026

To,

All Chief Registrars of Births and Deaths
(All 27 States and UTs working on CRS portal)

**Subject: Restriction on Multiple Logins on the CCRS Portal – reg.**

Madam/Sir,

This office has received certain representations from States regarding difficulties being experienced due to restriction on simultaneous access to the Central Civil Registration System (CCRS) Portal through the same user credentials from multiple devices/users.

2. In this regard, it is informed that, this feature has been implemented on the Central CRS Portal to further strengthen system security and safeguard user accounts in view of various security threats and as per the standard IT protocol. Accordingly, concurrent login using the same user credentials from multiple devices/browsers has been restricted, and a single set of credentials can now be used by only one user at a time.

3. Further, it is informed that the Central CRS Portal provides a role-based user management facility whereby Registrars can create additional authorized user accounts, i.e. Data Entry Operator (DEO) accounts, as per operational requirements. DEOs may complete and submit reporting forms through their individual login credentials, while the Registrar may verify and issue the certificate. Therefore, the requirement for simultaneous access by multiple users can be adequately addressed through the existing user management mechanism available in the portal.

4. Further, the restriction on concurrent login through the same user credentials constitutes an important security measure designed to prevent unauthorized access, misuse of credentials, and potential security breaches. Any relaxation of this restriction may compromise the security framework established for safeguarding the portal and user accounts.

5. In view of the above, it has been decided to continue with the restriction on multiple login through the same user credentials. All States/UTs are, therefore, advised to make use of the facility for creation of additional authorized user accounts, including DEO accounts, in accordance with their operational requirements.

6. It is requested that the above instructions may be brought to the notice of all concerned registration functionaries under your jurisdiction for compliance.

Yours faithfully,

(A.K. Pandey)
Deputy Registrar General (CRS)

Copy to

1. Director, Directorate of Census Operations (of all 27 States and UTs working on CRS portal)

(A.K. Pandey)
Deputy Registrar General